International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा गोवंश सुधार: एक राजधर्म

**चव्हाण मनोज उकंडराव**

*Corresponding Author –* ***चव्हाण मनोज उकंडराव***
**DOI - 10.5281/zenodo.15245326**

**सारांश :**

*१) शाश्वत विकासासाठी मानव्यशास्त्र, वाणिज्य व विज्ञानातील नाविन्यपूर्ण संशोधन या विषयांतर्गत एक दिवशीय राष्ट्रीय परिषद स्वागतार्ह आहे.*

*२) राष्ट्र- राज्य किंवा त्या त्या विद्यार्थी,संशोधक,शिक्षक,संस्था-महाविद्यालय व विद्यापीठासाठी संशोधन महत्त्वाचेआहे.*

*३) प्रस्तुत विषयावर संशोधन करणे बौद्धिक तसेच सर्वांगीण घटकाला चालणा देण्यासाठी अनुकूल असेच आहे.*

*४) राष्ट्रीय परिषदांच्या माध्यमातून निवडलेल्या विषयावर,त्यादृष्टीने केलेले संशोधन – शोधनिबंध राष्ट्रविकासाला चालणा देणारा आहे.*

*५) प्रस्तुत शोधनिबंधात 'शाश्वत विकासासाठी मानव्यशास्त्र,वाणिज्य व विज्ञानातील नाविन्यपूर्ण संशोधन' या अंतर्गत 'मराठी संतांच्या विचारांची उपयुक्तता' या विषयावर आधारीत 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा गोवंशसुधार :- एक राजधर्म' हा विषय घटक शोधनिबंधासाठी निवडलेला आहे.प्रस्तुत शोध निबंधासाठी आधारभूत व संदर्भग्रंथाचा आधार घेतला आहे.*

**प्रस्तावना:**

"महाराष्ट्र ही संताची व वीरांची भूमी आहे. भारतीय संस्कृतीचे आणि उदात्त जीवन मूल्यांचे अधिष्ठान बहुभाषीय भारतीय साहित्याला लाभले आहे. भारतातील इतर प्रदेशांपेक्षा महाराष्ट्राची प्रवृत्ती मूलतः भिन्न आहे.वीरत्व आणि वैराग्याच्या परंपरा इथे एकत्र नांदलेल्या आहेत. महाराष्ट्रात सर्वच भावनांचे आणि विचारांचे प्रवाह मराठी साहित्यात एकत्र आले. मराठीची साहित्य गंगा प्रवृत्ती आणि निवृत्तीच्या काठाकाठाने वाहिली."१ महाराष्ट्राच्या पावन भूमीत मुकुंदराज, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास, संत सेवालाल ते आधुनिक – स्वातंत्र्योत्तर काळातील सर्व प्रवाह- प्रकार याशिवाय संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पर्यंतचा प्रवास सर्वश्रुत आहे. संतानी लौकिक व अलौकिक भूमिका मांडली. त्यांच्या अभंगांतून, ओवी-साहित्यातून विश्वाच्या कल्याणासाठी अविरत धारा वाहू दिली. व्यक्तीत्वामधून भजन कीर्तनातून वाहू दिली. संत गाडगे बाबा यांचे लोकोत्तर जीवन व कार्य अतुलनीय आहे. या पार्श्वभूमीवर सर्वांचे कल्याण होवो हे ब्रीद राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या वाणी- कृती आणि सहभागातून अभिव्यक्त झाला आहे. जगाने नोंद घ्यावी, आपल्या देशाने त्यांचे विचार प्रत्येकांपर्यंत पोहोचवावे. देशातील प्रत्येक व्यक्ती, समाज,गाव-खेडी-तांडे स्वयंपूर्ण झाली पाहिजे. यासाठी 'ग्रामगीता' निर्माण केली. त्यांचा हा ग्रंथ आधुनिक - वैज्ञानिक दृष्टिने समन्वय साधून, जगा समोर ठेवलेला अभ्यासपूर्ण एक मापदंड आहे. एक बहुआयामी संकल्पवर्धक वस्तूपाठ आहे. त्यांची 'ग्रामगीता' विकासासाठी प्रेरणा आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील यावली गावी झाला आहे. त्यांची समाधी स्थळ गुरूकुंज येथे आहे.

प्रस्तुत शोधनिबंधात ग्रामगीतेतील एकूण अध्यायांपैकी ग्रामपंचकातील 'गोवंश सुधारणा' या प्रकरणावर प्रकाश टाकलेला आहे.

एकविसाव्या शतकात गोवंशसुधार काळाची गरज आहे. गोवंशसुधार एक राजधर्म आहे. त्यामुळे विषयाचे विवेचन अन्युस्युत आहे. प्रस्तुत शोधनिबंधासाठी सर्व आवश्यक संशोधनाच्या कसोटीचा वापर केला आहे. विस्ताराने चर्चा करण्याचा प्रामाणिक मानस आणि उद्देश आहे. हा शोधनिबंध देशासमोर राष्ट्रकल्याण- राष्ट्रहित समजून उजागर होणे आवश्यक आहे.

**विषय विस्तार:**

शोधनिबंधाचा विस्तार करण्यापूर्वी थोडक्यात महाराष्ट्र आणि मराठी भाषा व साहित्याविषयी महती विशद करताना म्हणता येईल की, "देशातील सर्वात प्रगतीशील आणि पुरोगामी राज्य म्हणून आज महाराष्ट्राचा लौकिक आहे. साहित्य, कला, कृषी, शिक्षण, उद्योग, संशोधन अशा सर्वच क्षेत्रात महाराष्ट्रा नंनेत्रदी पकप्रगती केलीआहे. महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी अनुकूल आणि पोषक वातावरण निर्माण करण्याचं महत्त्वाचं कार्य मराठी साहित्यानंकेलं आहे."२

मराठी माणसाच्या मनात विचारांचे बीज रुजविण्यापासून सातासमुद्रा पारयशाची उत्तुंग भरारी घेण्याचे बळ मराठी साहित्याने, संतांच्या साहित्याने दिले आहे. महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव समृद्ध करण्यात मराठी संत साहित्य आणि साहित्यिकांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

मराठी भाषा अभिजातच होती. राजभाषाहोती. मग तो मराठी भाषेचा गौरव असो किंवा त्यादृष्टीने मराठी भाषेला मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा असो तो महाराष्ट्राचा सम्मान आहे. मराठीचा सम्मान आहे. संतमाऊलीचा सम्मान आहे. त्याचबरोबर अलिकडे प्रारंभ ते राजधानी दिल्लीत होणारे ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन असो, महाराष्ट्र सरकारने गाईला दिलेला राज मातेचा दर्जा असो, बंजारा समाजाची ऐतिहासिक विरासत उद्घाटन असो, दिडसे वर्षानंतर प्रयाग राज येथील एकतेचे प्रतीक महाकुंभ असो, हे सर्व विशेष मराठी साहित्य, संस्कृती - सभ्यता व इतिहासाचे वैभव आहे.सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक व वाड्मयीन वैभव आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे या संदर्भातले विश्लेषण अभूतपूर्व व अलौकिक आहे.साधी सोपीसरळ भाषा वापरून जनमानसांच्या मनावर ठसा उमटवणे व जीवन दर्शन घडविणे ही किमया व निसर्गदत्त प्रतिभा केवळ राष्ट्रसंताच्या ग्रामगीतेत ओतप्रोत भरलेले आहे. गोवंशसुधारणा या प्रकरणात अभिव्यक्त झाली आहे. हे प्रकरण अतिशय महत्त्वाचे आहे.

**ग्रामगीता-स्वरूप व महत्त्व:**

'ग्रामगीता' हा महान ग्रंथ तुकडोजी महाराज यांनी यांनी लिहिलेला आहे. ग्रंथाला लाभलेली अर्पणपत्रिका ग्रामनाथाला समर्पित आहे. मुखपृष्ठावर महाराजांची हास्यमुद्रा व मलपृष्ठावर राष्ट्रवंदना ग्रंथाचे माहात्म्य दर्शन घडविते.

आज, भारताला विकास करायचे असेल तर ग्रामाची सुधारणा आवश्यक आहे.ग्रामाचा विकास किंवा सुधारणा करण्यासाठी जीवनातील विविध कक्षांचा, घटकांचा विचार महत्त्वाचा आहे. कारण तसा विचार करणे हे अलिकडच्या काळात राष्ट्रधर्म, राजधर्म पालन करण्याचे उदात्त कार्य आहे. 'ग्रामगीता' यासाठी वंदनीय आहे. तुकडोजींचे विचार यासाठी अनमोल आहे. आणि त्यासाठी त्यांचा विचार राजधर्म पालन करायला लावणारा आहे. जनमाणसाला प्रेरणा देणारा आहे.

प्रस्तुत ग्रंथात आठ पंचक अष्ठ म्हणून महत्वाचे आहे. त्यांची नावे तेवढीच व्यापकता व विशालता दर्शविते. सद्धर्ममंथन, लोकशीकरण, ग्राम निर्माण, दृष्टी परिवर्तन, संस्कार शोधन, प्रेमधर्म स्थापन, देवत्व साधन, आदर्श जीवन, इत्यादी. यातील महत्त्वाचा ग्राम निर्माण पंचक पंचप्राण म्हणून आवश्यक

आहे. ग्रामरक्षण, ग्रामसुद्धी, ग्राम निर्माणकला, ग्राम आरोग्य इत्यादी.पैकी गोवंशसुधार यातील महत्त्वाचा विषय असून, त्यामुळे आपण राजधर्म, राष्ट्रधर्म राष्ट्र कल्याणाचे मूलमंत्र म्हणून पाहणे काळाची गरज आहे.

संताचे विचार ओवी- अभंगातून, भजन कीर्तनातून अभिव्यक्त झाले आहे.सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, वाङ्मयीन, शैक्षणिक, पर्यावरणीय, आर्थिक इत्यादी विषय घटकाला धरून अभिव्यक्त झाले आहे. संत ज्ञानेश्वरांचे 'माझ्या मराठीचे बोलु कौतुके...', तुकारामांचे 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे...', रामदासाचे 'मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा...', संत सेवालाल यांचे ' जाणतो, छाणजो, पचच माणजो', वचन किंवा संत गाडगेबाबा यांचे 'दशकलमी' सुत्र असो, सर्वांच्या विचार,वचन व कवणातून मानव कल्याणाचे स्वरूप विशद झाले आहे.अलिकडे महाराष्ट्राने गौमातेला राजमातेचा दर्जा देऊन सर्वांना धन्य केले आहे. मात्र यावरून हे स्पष्ट होते की, इथेच न थांबता गोवंशसुधारणा आवश्यक आहे. गोवंश विस्तार आवश्यक आहे. यांत्रिकीकरणाच्या नावाखाली आज देशात, राज्यात पशुपालन, पशुसंवर्धन, गुरांचा व गौसुधार क्रमप्राप्त आहे.

वरील विषयावर विस्ताराचे सखोल अभ्यास व चर्चा करता येईल एवढे सामर्थ्य ग्रामगीतेत आहे. महाराजांनी आरंभी सद्धर्म दर्शन घडवतात.

**"ओम नमोजी विश्वचालका! जगद्वंद्या ब्रम्हांडनायका!**
**एकच असोनी अनेका! भाससी विश्वरूपी!!३**

(हे विश्वाचा चालक तुला नमन, जगाला वंदनीय ब्रम्हांडनायका तुला वंदन, तू एक आहे परंतु अनेक रूपात दिसतो.)

आणि म्हणून सर्वठायी तूच आहेस. निर्माण करता, करविता, विधाता तूच आहेस. मानवी शरीराला पंचप्राण आवश्यक आहे. त्याला पंचमहाभूते म्हणतात. तसेच ग्राम निर्माणाला पंचक आवश्यक आहे. अलिकडच्या काळात भारत सरकार व राज्य सरकार मिळून अनेक कल्याणकारी योजना व सुविधा राबवित आहे.ग्रामगीतेला संपूर्ण श्रेय द्यावे लागेल.

भारत हा कृषीप्रधान देश आहे. लाखो खेडींनी बनलेला देश आहे. शेतकरी, कष्टकरी सर्व सामान्य सोबत पाळीव प्राणी म्हणून देशाला मोठे करण्यासाठी हे सर्व आप आपला योगदान देत असतात. खेड्यांना स्वयंपूर्ण करायचे असेल तर शेती सोबत पुरक परंतु तेवढेच आधुनिक व्यवसाय काळजी गरज आहे. शेतीला उत्तम पूरक व्यवसाय गोवंशसुधारणा ठरणार आहे. कारण अलिकड च्या काळात गोवंशबद्दल वाढत चाललेली अनास्था, नकारात्मकता त्यावर जनजागृती होऊन त्या मध्ये सुधारणा घडवून, निसर्गाची, शेतीची, मानवाची सुंदरता व समृद्धता परत आणण्यासाठी सर्वोतोपरी व सर्वस्तरातून प्रयत्न होणे गरजेचे आहे. तुकडोजी महाराज यांनी हा प्रकरण लिहून समाज व देशाला जागा करण्याचा प्रयत्न केला आहे

**दूध अमृततुल्य:**

दूध हे अमृत आहे.लहान बाळा पासून ते वृद्धां पर्यंत सर्वांना दुधाची आवश्यकता आहे. ताक,तूप, लोणी, श्रीखंड ते चाकलेट इत्यादी पदार्थ बनतात.

**"एक श्रोतियाने प्रश्न केला! दुधाचा तर दुष्काळचि पडला!**
**कुठले ताक लोणी सकळाला! गोमातेचे!!"४**

गाईला माता म्हटले आहे. राजमाता म्हटले आहे. कारण तिचे आणि तिच्या दुधाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. गाई, म्हशींचे दूध पूरक आहे. परंतु पाणी, दुधाची बाजारात भाववाढ आदि प्रश्न निर्माण होत आहे. दिवसेंदिवस गाई म्हशींची संख्या कमी होत आहे. हा चिंतेचा विषय आहे असे महाराज म्हणतात. त्यामुळे सुधारणा आवश्यक आहे. गुरांचे पालन आवश्यक असून, सरकारने सर्वोतोपरी प्रयत्न करणे गरजेचे आहे. भगवद्गीतेत अर्जुनाने श्रीकृष्णाला प्रश्न विचारला कि 'तुम्ही कोण?' ते उत्तर देतात 'मी गोपालक आहे.' यादवकालीन संस्कृतीमध्ये दुधाची नदी वाहायची. समृद्धता होती. तात्पर्य गाई म्हशींची उपलब्धता वाढते, आधुनिक पद्धतीने वाढविणे आवश्यक असून देशातील सर्व गाई म्हशी पालक पाळीव प्राणी पालकाला भारत सरकारने, राज्य सरकारने आवश्यक ते मानधन देऊन

त्यांचा सम्मान करणे गरजेचे आहे.सोबतच पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे. सरकारने किंवा सर्वस्तरातून हा प्रयत्न झाला तर पुढील पिढ्यांना नक्कीच लाभ होईल. महाराजांनी हा संदेश यातून दिला आहे.

**"गोपालकांचा देश भारत! आला गायीगुरे पुजीत!**
**परंतु गायी झाल्या कमी! लक्षचि नाही त्याकडे!!"५**

गायी आज संख्येने कमी होत आहे. प्राचीन काळी गाई पाळल्या जात. त्यामुळे मागील पिढीतील लोकांना पोषण मिळालं. भारत हा गायी पाळणारा प्रमुख देश आहे.परंतु आवश्यक पाश्चात्य मोह आणि चंगळवाद, भौतिकवादा च्या प्रलोभनामुळे माणूस हा पाळीव प्राण्यांकडे लक्ष कमी करीत चालला आहे. ही देशासाठी धोक्याची घटना आहे.

**चारापाणी:**

**"चारापाणी अतिमहाग! नाही व्यवस्थेसाठी मार्ग!**
**मानवचि अर्धपोटी मग! गायी कैसा पाळाव्या?"६**

महाराजांनी मानवाला सूचक संदेश दिला आहे. सावध केला आहे. ज्या देशात माणसाला राहायला घर नाही. त्यामुळे तो गाईची रक्षा व त्या साठी चारापिकाची व्यवस्था कशी करणार? मात्र त्यामुळे प्रश्न सुटणार नाही. तर तिच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी पाऊल उचलणे गरजेचे आहे. तसेच तिच्या चारापाणी संदर्भात व्यवस्था करणे गरजेचे आहे. राष्ट्रीय जंगलं,वने,कुरणे व विषमुक्त पर्यावरण तिला आहारासाठी उपलब्ध होणे गरजेचे आहे. महाराजांनी हेच विचार सांगीतले आहे.

**गोवंश शेतीला पूरक:**

**"भारत हा कृषीप्रधान देश! शेतीसाठी हवा गोवंश!**
**गोरसा इतुका नसे सत्त्वांश! अन्यत्र शुद्ध!!७**

सुरवातीला गायी होत्या. गोवंश होता.तेव्हा कोणत्याही प्रकारची दरिद्रता नव्हती. रोगराई नव्हती. गायीच गायी होत्या. खेडी,गाव, तांडे समृद्ध होती.स्वस्थ होती. संतानी प्राणी बद्दल ज्ञानेश्वरपासून विचार मांडले आहे. तुकाराम रामदासांनी महती सांगीतली आहे. भूतयावादी असावे असे म्हटले आहे. श्रीकृष्ण पालक तर भगवान शंकराला पशुपती म्हटले आहे. संत सेवालाल गौपालक होते. जवळपास चार हजार गायीचे पालक होते. (भजन- मोहन महाराज) यावरून भारतीय अध्यात्म, संस्कृती व इतिहास समोर येते. पशुपालन सारखा व्यवसाय जगात नाही. महारांजाने यावर प्रकाश टाकलेला आहे. त्यांनी सांगितल की, शेतीला गोवंश हा पूरक व्यवसाय आहे. पशुपालना मुळे पृथ्वीचे, वसुंधरेचे, मानवाचे रक्षण होणार आहे.गायी, पाळीव प्राणीं पासून गोमूत्र, शेणखत, भूमिची प्रत सुधारते. सुपिकता येते. तेव्हा देश गाव धन धान्यांनी पेवे भरून असायचे. ढोले भरून असायचे. आज मात्र कमी होत चालले आहे. भारत शेती व पूरक व्यवसायाच्या बळावर जगात प्रथम क्रमांक मिळवू शकतो. मात्र त्यासाठी सक्षम व्हावे लागेल. महाराजांनी हे कार्य प्रकरणातून केले आहे.

**जोडधंदा:**

**"भूमि आणि जनावरे! हीच उत्पत्तीची कोठारे!**
**एकाची अनेक होती खिल्लारे! जोडधंदा हा घरोघरी!!८**

कृषी व्यवस्था टिकविण्यासाठी, शेतीला समृद्ध करण्यासाठी भूमि कसणे सोबत जोडधंदा म्हणून जनावरे पालन करणे आवश्यक आहे. जोडधंदा घरोघरी दूध, अन्नधान्य सहायक, वृद्धांना आधार, सशक्त व निरोगी राहण्यासाठी महत्त्वाचा आहे. म्हणून गायीगुरं याला गोधन , हे सत्य मानले गेले आहे. कारण हे सर्व सुखी भारताचे स्वप्न राहिले आहे. परंतु राज्याला नजर लागली. आणि या व्यवसायाकडे दुर्लक्ष झाले. महाराजांनी यावर प्रकाश टाकला आहे.

पाळीव प्राण्यांच्या व गायींच्या संरक्षणासाठी इतिहासात अनेक संत, सुधारक, विचारक, राजांनी व ईश्वरांनीसुद्धा प्रयत्न केले आहे. ग्रामगीता यासाठी सर्वोत्तम आहे.गायीच्या रक्षणासाठी तर अनेकांनी बलिदान दिले आहे.भगवान श्रीकृष्ण, शिवशंकर, वसिष्ठ, दत्त दिगंबर, छत्रपती शिवाजी महाराज, संत सेवालाल तसेच अनेक संत भक्त ,गोभक्तांनी समोर येऊन कार्य केले. गायींच्या शरीरात देवी देवतांचा वास असतो. तिला कामधेनू म्हटले आहे. तिला माता, लक्ष्मी वर्णिले आहे. गाय आरोग्यधाम आहे. राष्ट्रसुखाचा मार्ग आहे. गायी सात्विक सौंदर्य आहे.गायीची जोपासना समृद्ध भारताचे सौभाग्य ठरणार आहे.

**"गावी सुंदर गायींचा तांडा! चराया गोचर भुमि उदंडा!**
**नदी, तळे, विहिरीचा आखाडा! भव्य जैसा!!९**

गायीचे रक्षण करणे हे कल्याणकारी कार्य आहे. चारापासून ते दुधापर्यंत सर्व उपयोग तिच्या अस्तित्वामुळे आहे. तिला वाचवणे- वाढवणे गरजेचे आहे. गायींचा अभ्यास झाला पाहिजे असे महाराज सांगतात. गायीचे प्रजनन सृष्टी व शेतीसाठी आवश्यक आहे.

**गोवंशसुधारामुळे संसारी लाभ:**

व्यायाम, कुस्ती, शक्ती, आरोग्य, संपत्ती मिळविण्यासाठी गोवंश सुधार आवश्यक आहे असे महाराज सांगतात. ते म्हणतात -

**"आबाल वृद्धनर, नारी! यासाठी झटतील घरोघरी!**
**तर सर्व सुखे संसारी! लाभतील त्यांना!!१०**

सर्व आवश्यक सुख व लाभ घेण्यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न होणे गरजेचे आहे. गायीपासून दूध, आरोग्य, श्रम लाभेल. सर्व लोकांना गाव शहर असोमग निरोगी होईल. व्यसने, आळस , दुराचार कमी होईल. सद्गुण जन्म घेईल. गावचे जीवन सुधारेल. सर्वांचे भविष्य उज्ज्वल होईल.

**संस्कार, आरोग्यासाठी पावित्र्य:**

**"ऐसे करावे एकेक कार्य! जेणे गावी नांदेल सात्विक सौंदर्य!**
**यातचि स्वर्गीय सुखाचे माधुर्य! तुकड्याम्हणे!!११**

महाराजांचे गोवंशसुधारणे बद्दलचे विचार अनमोल आहे. त्यांनी संस्कार, श्रम ते आरोग्य व गाव शेती ते राष्ट्र अशा सर्वांना धरून विचार मांडले आहे. सर्व सुखाचे आगर किंवा स्वर्गाचे सौंदर्य ग्रामीण भारताकडे लक्ष दिले तर जाणवेल. पशुपालन अथवा गोवंश पालन केले तर जाणवेल असे सुचक विधान ते करतात. शेवटी स्वर्ग सुखाची मधुरता इथेच आहे असे ते सांगतात. स्वअनुभवातून ही ग्रामगीता ग्रंथ गुरू शास्त्र समोर कथन करतात.

**निष्कर्ष:**

१) प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा गोवंशसुधार:- एक राजधर्म हा असून, त्याचा विचार विस्ताराने मांडलेला आहे.
२) प्रस्तुत शोधनिबंध संशोधनाच्या दृष्टीने स्वागतार्ह असून राष्ट्र विकासाला चालना देणारा आहे.
३) महाराष्ट्र ही संताची आणि वीरांची भूमी म्हटली जाते. त्याला संस्कृतीचे आणि उदात्त जीवन मूल्यांचे अधिष्ठान लाभले आहे.
४) ज्ञानेश्वरांपासून तर राष्ट्रसंतांपर्यंत ही साहित्य गंगा अविरत वाहत राहिली आहे.
५) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा ग्रामगीता हा ग्रंथ प्रेरणा देणारा आहे.
६) ग्रामगीतेतील एकूण अध्यायांपैकी ग्रामंपंचकातील 'गोवंशसुधारणा' हा प्रकरण राजधर्म पालन करायला लावणारा राष्ट्र कल्याणाचा मूलमंत्र आहे.
७) भारतीय संस्कृती व इतिहासात गोवंशसुधारणा वंदनीय राहिली असून तिचे संवर्धन काळाची गरज आहे.
८) मानवजातीला, शेतीला व राष्ट्राला वाचविण्यासाठी गाईचे रक्षण करून प्रत्येकाने हा राजधर्म पाळला पाहिजे. असा संदेश राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी दिला आहे.
९) महाराष्ट्र शासनाने गायीला राजमातेचा दर्जा देऊन महाराष्ट्राचा सम्मान केला आहे.

**आधारभूत ग्रंथ व संदर्भ ग्रंथ:**


१) नसिराबादकर ल.रा., प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर
२) नलावडे प्रमोद संपा, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, जाने- फेब्रु २०१२
३) महाराज तुकडोजी राष्ट्रसंत, ग्रामगीता, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तकनिर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,पुणे,